ISSN No.: 2321-0931

14-15

# शैक्षणिक जिज्ञासा

# Shekshanik Jigyasa

A peer-reviewed Journal for Education, Democracy, and Humanism

संशोधन, शिक्षण, तंत्रज्ञान, लोकशाही व मानवतावाद यांना वाहिलेले नियतकालिक

संपादक
डॉ. प्रकाश नागदेवते

Year III, Issue I & II Quarterly Jan 2015 to June 2015 Issn No. 2321-0931

शैक्षणिक जिज्ञासा
**Shekshanik Jigyasa**

A peer - reviewed journal for Education Democracy and Humanism
संशोधन, शिक्षण तंत्रज्ञान, लोकशाही व मानवतावाद याना वाहिलेले नियतकालीन
Issn No. 2321-0931

Year III Issue I & II Quartely Jan 2015 to June 2015 Issn No. 2321-0931

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| 1 | संपादकीय | | 1 |
| 2 | भविष्यकालीन समाज, युवानेतृत्व आणि शिक्षण व्यवस्था | डॉ. प्रकाश नागदेवते | 2 |
| 3 | नारायण सुर्वे याची कविता एक आकलन | प्रा. रा.तु. आदे | |
| 4 | एक विद्रोही क्रांतीसूर्य बिरसा मुंडा | कु. रुपाली तुळशीराम तोडकर | |
| 5 | राजर्षी शाहू महाराजाचे शैक्षणिक कार्य | श्री. प्रवीण गौतमराव वाळके | |
| 6 | बेरोजगारीचे अ (न) र्थशास्त्र | प्रा. माधुरी राखुंडे | |
| 7 | ज्ञानेश्वर वाकुडकर यांचा अंगार आणि शृंगार | श्री. महेश मुकंदराव अडगुलवार | |
| 8 | कचऱ्याचे व्यवस्थापन | प्रा. सरोज यादवराव लखदिवे | |
| 9 | पुर्वग्रह उगम कारणे व उपाय | प्रा. दिनेश रा. जारोंडे | |
| 10 | Tourism : Approach & Scope | प्रा. एन.व्ही. नरुले | |
| 11 | Plight of woman in Arundhati Roys Novel The god of small things | Prof. P.S. Jawade | |

# बेरोजगारीचे अ(न)र्थशास्त्र

प्रा. माधुरी राखुंडे
व्यावसायिक अर्थशास्त्र विभाग प्रमुख
इंदिरा महाविद्यालय कळंब,
जि. यवतमाळ.

प्रस्तावना :–

देश विकसीत असो वा अविकसीत संपूर्ण देशाच्या अर्थव्यवस्थेला भेडसावणारा गंभीर प्रश्न म्हणजे बेरोजगारी होय. विकसीत अशा अमेरिका, इंग्लड,युरोपीय देशांनाही बेकारीने ग्रासले आहे. हे देश आपल्या आर्थिक ताकदीच्या जोरावर आपली बेकारी वाढू नये म्हणून विकसनशिल देशातल्या बाजारपेठा खुल्या करून तेथिल उद्योगधंदे मारून तेथे विस्थापित व बेकारांचा भस्मासूर वाढवित आहे. भारतात बेकारीचा प्रश्न एवढा गंभीर आहे की बेकारांनी जर संपूर्ण भारतीय उपखंडाला चार वेळा वेढा घातला तरी रांग संपणार नाही. अशा या बेकारीचे खापर लोकसंख्या वाढीवर, आरक्षणावर फोडून बेकारीची कारणे दडपली जातात. हे वास्तव आहे. भारतात बेकारी का वाढते आहे, याची मुळ कारणे कोणती याचा शोध घेणे अत्यंत आवश्यक आहे.

बेकारीची आग ही वणव्यासारखी पसरली आहे. यात लाखो तरूण–तरूणी होरपळत आहे. अशा या बेरोजगारीचे स्वरूप किती भिषण आहे याची कल्पना एका उदाहरणावरून करता येईल. रेल्वतील २०,००० जागांची भरती जाहीर झाली तेव्हा अर्ज ७४ लाख आले. ८ वी पास ही अट असतांना एम.ए., एम.बी.ए, बी.ई. आदी हजारो पदवीधरांचे अर्ज आले. परक्या कंपन्या व आयात मालाच्या अतिक्रमणामुळे कारखाने, गिरण्या बंद किंवा आजारी आहेत. बेलगाम संगणकीकरणामुळे, आधुनिकीकरणामुळे संघटित उद्योगातील लाखो नोकऱ्या नष्ट झाल्या आहेत, आणि असंघटित क्षेत्रात तर राबराब राबूनही कामाची, व किमान वेतनाची शाश्वती नाही. गेल्या १५ वर्षात वाढत चाललेल्या शेतकरी आत्महत्यातून हे स्पष्ट दिसते. रोजगार विनिमय केंद्राद्वारा नोकरी मिळणे सोडाच पण साधे कॉलही येणे अशक्य झाले आहे, व पैसा चारल्याशिवाय, वशिला लावल्याशिवाय नोकरी मिळणे शक्य नाही. सत्ताधारी निवडणूक पूर्व काळात रोजगाराचे आश्वासन दाखवतात. प्रत्यक्षात मात्र बेकारांची संख्या व त्यांची फौज वाढून तरूणांमध्ये नैराश्य व वैफल्य पदरी टाकतात. अश्या या बेरोजगारीचे स्वरूप समजून घेणे •हा या लेखाचा उद्येश आहे.

बेरोजगारीची संकल्पना :–

प्रो. पीगू यांच्या मते– "जी व्यक्ती प्रचलीत मजुरीदराने काम करण्यास तयार असते परंतू तिला काम मिळत नाही तेव्हा अशा व्यक्तिला बेकार समजले जाते."

कामगार दल च्या संदर्भात व्याख्या :–

" काम करण्याची इच्छा व पात्रता असूनही काम करण्याची संधी मिळत नसेल तर त्यांना बेकार म्हणावे."

बेरोजगारीबद्दलचे भ्रम :–

१) लोकसंख्यावाढीमुळे बेकारी वाढते?

लोकसंख्यावाढीमुळे बेकारी वाढते हे शुध्द थोतांड आहे. गेल्या ४५ वर्षात आपल्या देशातील लोकसंख्यावाढीचा वेग फार धिम्या गतीने का होईना पण कमी होत आहे. २००१ च्या जनगणनेत दिलेल्या माहिती नुसार भारतातील

लोकसंख्या वाढीचा वेग १९७१–८१ च्या दशकात २४.७ होता., १९८१ते ९१ मध्ये तो २३.८ तर १९९१–२००१मध्ये तो २१.५ टक्क्यांपर्यंत कमी झाला पण याच काळात बेरोजगारीच्या वाढीचा वेग १९६१ ते ७१ मध्ये १२.२ टक्के १९७१ ते ८१ मध्य १५९.१३ टक्के आणि १९८१ ते ९१ मध्ये तो १७८.२३ टक्क्यांपर्यंत पोहचला. म्हणजे एकीकडे लोकसंख्या वाढीचा वेग कमी होत असून दुसरीकडे बेरोजगारीचा दर वाढत आहे, नव्हे प्रचंड आहे.

भांडवलशाही देशात लोकसंख्या वाढ नगण्य असूनही त्या देशात बेकारी आहे. भांडवलशाही तंत्रज्ञान, तांत्रिक विकास व तेजी, मंदीची लाट यावर बेकारी अवलंबून असते. कोणत्याही विकसनशिल देशाचे उदाहरण घेतले तरी लक्षात येईल की तिथे कितीतरी कामे पडून आहेत. लाखो निरक्षरांना शिक्षण दयायचे आहे, मैलोनमैल पडीक जमीन, पाणलोटक्षेत्र विकासतंत्राने फुलवायची आहे, लाखो रूग्णांची, अपंगांची काळजी घ्यायची आहे व यासाठी फार मोठया मनुष्यबळाची आवश्यकता आहे. ते उपलब्ध आहेत पण ते बेकार राहते. जमीन विकास, शिक्षण, आरोग्य सुविधा यासाठी उपलब्ध मनुष्य बळ वापरले जात नाहीत. कारण या कामातून भांडवलदारांना नफा मिळत नाही. संगणकीकरण व यांत्रिकीकरणामुळे त्यांना नफा अधिक मिळतो. त्यामुळे आहेत तेच कामगार त्यांना नोकरीवरून काढून बेकारी वाढविण्यातच त्यांचे हितसंबंध गुंतलेले असतात. म्हणून बहुराष्ट्रीय कंपन्याच्या व मोठया कंपन्यांच्या नफेखोरीसाठी राबविल्या जाणाऱ्या धोरणांमुळे बेकारीमध्ये वाढ होत आहे.

केरळमध्ये जमीन सुधारणा कायद्याची चोख अंमलबजावणी, शेतमजुरांना जीवनवेतनाची तरतूद, खेडोपाडी स्त्री शिक्षण व आरोग्य सुविधांचे जाळे असे मुलगामी बदल घडविल्याने केरळमधील जन्मदर पुढारलेल्या औदयोगिक देशाप्रमाणे १.७ टक्के पर्यंत उतरला परंतु तेथे बेकारी प्रचंड आहे.

देशातील समस्यांचे खापर वाढत्या लोकसंख्येवर फोडण्यापेक्षा भांडवलदार राज्यकर्त्यांनी वरील अनुभवातून विचार करण्याची गरज आहे.

**२) शिक्षणाचे प्रमाण वाढल्यामुळे वाढत्या शिक्षणानुरूप नोकऱ्या उपलब्ध होत नाहीत याउलट बेकारीत भर पडते असा गैरसमज आहे :–**

परंतु प्रत्यक्षात भारतात शिक्षणाचे प्रमाण किती आहे याचा विचार होणे आवश्यक आहे. २००१ च्या जनगणनेनुसार देशातील ३५ टक्के जनता, म्हणजे ६ वर्षे वयावरील २६ कोटीहून अधिक लोक निरक्षर आहेत. जगात ५४ टक्के लोक निरक्षर केवळ भारतात आहेत.

शिक्षणाच्या विस्तारामुळे बेरोजगारी वाढते असे म्हटले जाते, परंतु शिक्षण असो वा नसो बेरोजगारी तितकीच राहते. शिक्षणामुळे एवढेच होते की, अशिक्षित बेरोजगारीचे रूपांतर सुशिक्षित बेरोजगारीत होते. शिक्षण आणि बेरोजगारी यांचा विकृत संबंध जोडणारा आणखी एक युक्तिवाद असा की, " देशात काम भरपूर आहे हा, पण ही आजकालची पोरं अंगमेहनतीचे काम करायला तयार आहे कुठे? सर्वांना टेबल खुर्च्यांवरची कामे पाहिजेत. मग बेकारी वाढणार नाही तर काय होणार? आळशीपणामुळे बेकारीत वाढ होत आहे. उच्चभ्रू वर्गातील असे लोकांचे संभाषण आपण ऐकतो. पण लाखो पदवीधर तरूण आज कंत्राटी कामगार आहेत. अत्यल्प वेतनावर बारा–बारा तास अंगमेहनतीचे कामे करतात. पदवी व पदव्युत्तर शिक्षित तरूण शहरा–शहरातून रांत्रदिवस ॲटोरिक्षा चालवतात किंवा विक्रेते म्हणून दारोदार फीरतात. हे त्यांना कुठे माहीत आहे. दरवर्षी हजारो लोक गांवाकडून शहरांकडे अर्धविकसीत प्रदेशाकतून विकसीत प्रदेशाकडे रोजगाराच्या शोधात येतात. अत्यंत बकाल वस्त्यांमधे राहून कंबर कसून मेहनत करतात. हे सत्य नाकारता येत नाही.

**३) परप्रांतीय लोंढे आपल्या प्रांतात आल्यामुळे बेकारीत वाढ होते:–**

परप्रांतीयांचे लोंढे आपल्या प्रांतात आल्यामुळे बेकारीत वाढ होते आणि म्हणून त्यांना हाकलून लावले पाहिजे. या कारणास्तव मुंबईत झालेली आगपाखड लक्षांत घेण्यासारखी आहे. मुंबईमध्ये परप्रांतीयांमुळे मराठी माणूस बेकार राहतो, त्यांच्या बेकारीत वाढ होते असे म्हटले जाते. नाशिक, नागपूर, पूणे, औरंगाबाद, कोल्हापूर यासांरख्या मोठया शहरात मराठी तरूण–तरूणी हजारोंच्या संख्येने बेकार आहेत.

महाराष्ट्रातल्या खेडयापाडयांत लाखो तरूण बेकार आहेत. तिथे कुठे परप्रांतीय आहेत. मुंबईत परप्रांतीय येतात त्यापेक्षा कितीतरी जास्त पटीने उर्वरीत महाराष्ट्रातून मराठी माणसे येतात. वास्तविकता अशी आहे की देशातील प्रत्येक राज्यात बेरोजगारीची समस्या भिषण आहे. ही एक देशव्यापी समस्या आहे. जागतिक समस्या आहे. या वादाचा फायदा फक्त सत्ताधाऱ्यांनाच होतो हे लक्षात घेतले पाहिजे. व खरे कारण काय याचा शोध घ्यायला पाहिजे.

**४) राखीव जागेमुळे बेरोजगारी वाढते :–**

अनेकदा आपण ऐकतो की राखीव जागा हे बेरोजगारी वाढण्याचे आणखी एक कारण आहे. या गैरसमजातून अनेकदा तरूणवर्गात असंतोष उसळला. आत्मदहनापर्यंत अनेकांची मजल गेली. गुजरातमध्ये वारंवार पेटविण्यात आलेली राखीव जागा विरोधी आंदोलने आणि मंडल आयोगाच्या अंमलबजावणीविरूध्द उत्तर भारतात उसळलेल्या दंगली हे त्याचे उदाहरण होय.

१० वर्षे धुळखात पडलेल्या मंडल आयोगाची अंशत: अंमलबजावणी करण्याचा निर्णय १९९० साली केंद्र सरकारणे जाहीर केला. सर्वोच्च न्यायालयाने नंतर ह्या निर्णयावर शिक्कामोर्तब केले. मात्र राखीव जागांच्या सवलतीतून सधन वर्गाला वगळावे, असा निर्णय झाला. अर्थात समाजातील बेरोजगारी व राखीव जागा यांचा संबंध लावणे योग्य वाटत नाही. आणि समजा मागासवर्गीय समाजातील बेरोजगारांच्या जागा प्रामाणिक भरल्या गेल्या तरी किती तरी मागासवर्गिय तरूण बेकार असलेले दिसतील. आणि राखीव जागा जरी आज काढून टाकल्या तरी त्यामुळे बेकारीचा प्रश्न यत्कींचीतही सुटत नाही. जास्तीत जास्त मागासवर्गीयांच्या काही नोकऱ्या खुल्या प्रवर्गाला मिळेल तरीही सर्व जातीतल्या मिळून एकूण बेरोजगारांची संख्या मात्र तेवढीच राहते. याचाच अर्थ असा की राखीव जागामुळे बेरोजगारी वाढते यात सत्यता वाटत नाही.

**५) अल्पसंख्याकामुळे बरोजगारीत वाढ :—**

विशेष करून मुस्लिमांची संख्या अमर्यादितपणे वाढत असल्याने त्याचा फटका मराठी माणसाला बसतो. अशी विधाने केली जातात. २००१ च्या जनगणनेनुसार देशाच्या एकूण लोकसंख्येत मुस्लिमांचे प्रमाण १३.४ टक्के होते. पण केंद्र सरकारच्या नोकऱ्यांत त्यांचे प्रमाण ४ टक्के होते व त्यातही प्रथम श्रेणी अधिकाऱ्यात केवळ तिन टक्के मुस्लिम होते. बँक कर्मचाऱ्यात त्यांचे प्रमाण दोन टक्के आणि रेल्वेत ते तीन टक्के होते. मुस्लिमांचे लाड केल्यामुळे हिंदूच्या रोजगारावर गदा येते असे म्हणणे संयुक्तिक वाटत नाही. बेरोजगारीची मुळ कारणे लपविण्यासाठी राज्यकर्ते व त्यांचे समर्थक बेरोजगारीबाबत असे गैरसमज पसरवित असतात.

**श्री. दादाभाई नौरोजी** यांनी **' पॉव्हर्टी अॅड अन ब्रिटिश रूल इन इंडिया'** या ग्रंथात भारताच्या आर्थिक शोषणाचा सिध्दांत मांडला आहे. यात दादाभाई नौरोजींनी, भारतातील ब्रिटिशांनी चालविलेले भारताचे आर्थिक शोषण जगाच्या चव्हाटयावर मांडले. यात ब्रिटिश भारतातील संपत्ती आपल्या देशात कशी वाहून नेत होते हे पुराव्यानिशी मांडले आहे यात ब्रिटिशांचे भारतातून फार मोठया प्रमाणात संपत्ती वाहून नेल्याचे धोरण राबविल्याने भारताचे मोठया प्रमाणात आर्थिक शोषण झाले असून ब्रिटिशांनी भारताला दरिद्री बनवून टाकले आहे असे प्रभावी विचार निस्सारण सिध्दांतात मांडले आहे

ब्रिटिशांनी केलेल्या पध्दतशीर शोषणामुळे भारतात दारिद्रय आले. त्यासोबतच भारतात स्थिर राजवट आली, प्रशासन आले, व रेल्वे या सारख्या बऱ्याच सेवाही आल्या. हेही नाकारता येत नाही. परंतु जेव्हा सेवा वाढतात तेव्हा रोजगारातही वाढ होते, तेव्हा देशातील नागरिकांना प्रशासनात व सेवांत काम मिळायला हवे होते परंतु ब्रिटिशांनी प्रशासनात अधिकारी वर्गाच्या जागा परकियांना दिल्या. तर चपराशी, झाडूवाले अशा मोजक्याच नोकऱ्या नाईलाजाने भारतीयांना दिल्या. कारण हलक्या कामासाठी युरोपियन लोक येथे येत नसत व त्यामुळे मोजक्या जागांवर भारतीयांची नेमणूक केली. परीणामत: परकीय लोकांनी पैसा, सत्ता, अनुभव, व कौशल्य या सर्व गोष्टी देश सोडून जातांना त्यांच्याबरोबर घेवून गेले.

शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा व दारिद्रय याचे मुळ कारण साम्राज्यशाहीच्या लुटीतच दिसते. ब्रिटिश राजवटीच्या प्रचंड खर्चाचा बोजा मुख्यत: सामान्य जनतेवर पडत होता. शेतसारा, अबकारी व अन्य कर ही सरकारी तिजोरी भरण्याची मुख्य साधने होती. पूर्वी राजे—रजवाडे सारा वसूल करीत तो देशातच वापरला जाई, परंतु ब्रिटिशांनी हिंदूस्थानची लूट करून इंग्लंडची भरभराट केली व भारतीय जनतेस दरिद्री केले.

ब्रिटिश साम्राज्यशाहीखालील दीडशे वर्षाच्या गुलामगिरीमुळे भारताचे केलेले शोषण व भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेले दूरगामी परीणाम हे भारतीय अर्थव्यवस्थेची कुंठीत अवस्था आणि दारिद्रय व बेरोजगारी वाढ याच्या मुळाशी आहे.

स्वातंत्र्य प्राप्ती नंतर भांडवलदारांनी देशाची सत्ता ताब्यात घेतल्या शासनाचे दिवाळखोर सिंचन धोरण, पाण्याचे असमान वाटप व त्यात भर घालणारे सातत्याचे कोरडे व ओले दुष्काळ, शासनाची बडे सधन जमीनमालक यांच्या भांडवली शेतीला प्रोत्साहनकारक धोरणे, शासन, जमीनदार व बागायतदारांनी किमान वेतन नाकारून शेतमजुरांची केलेली ससेहोलपट यामुळे सामान्य शेतकरी नागवला गेला. तो कर्जबाजारी झाला. लाखो शेतकऱ्यांच्या जमीनी जावून त्यांना बेरोजगारांच्या रांगेत उभे राहावे लागले.

**भारतीय अर्थव्यवस्थेचे खा. ऊ. जा. धोरण :—**

२१ शतकात जाण्याच्या नावाखाली १९८५ साली भारतीय अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण करण्याचा मार्ग स्विकारला आणि प्रचंड कर्जे काढून अवघ्या पाच वर्षात देशाला दिवाळखोरीकडे ढकलले. १९९१ साली सत्तेवर आलेल्या

नरसिंहराव सरकारने यावर तोडगा म्हणून पुन्हा भरमसाठ नव्या कर्जासाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँकेकडे धाव घेतली. कर्जाच्या मोबदल्यात भारतीय अर्थव्यवस्थेला अंकित करण्यासाठी या दोन्ही सामाज्यवादधार्जिण्या वित्तसंस्थांनी अनेक जाचक अटी भारतावर लादल्या. जागतिकीकरण आणि आर्थिक उदारीकरण या दोन तत्वांनुसार विदेशी कंपन्यांना जेव्हा भारतामध्ये खुलेआम प्रवेश दिला गेला त्यावेळी अशी कल्पना होती की, या कंपन्याच्या प्रवेशामुळे स्पर्धा वाढेल आणि या स्पर्धेचे स्वरूप निकोप असेल. या स्पर्धेमुळे भारतीय कंपन्याच्या उत्पादनांचा दर्जा वाढेल व एकूणच उद्योग, रोजगार आणि उत्पादने व सेवा यांच्या संख्येत आणि दर्जात वाढ घडून येईल परंतू प्रत्यक्षात तसे झाले नाही. कारण विदेशी कंपन्या स्वतःचे प्रकल्प साकार करण्याऐवजी या कंपन्यांनी भारतामध्येच अस्तित्वात असलेल्या कंपन्यांच्या मालकांना भरमसाठ अशा रकमेचे आमिश दाखवून त्या ताब्यात घेण्याचा सपाटा लावला. या कंपन्या ताब्यामध्ये आल्यानंतर त्यातील कामगारांना नाममात्र भरपाई देवून किंवा प्रसंगी ती देखील न देता कामावरून काढून टाकण्यात आले. त्यामुळे बेरोजगारीचे प्रमाण वाढले. ताब्यात घेतलेल्या कंपन्यांचे संगनकीकरण आणि यांत्रिकीकरण करून त्यांनी कमी मनुष्यबळात उत्पादने आणि सेवा यांची निर्मिती करण्यास प्रारंभ केला. या तंत्रामुळे आर्थिक उदारीकरणामागे भारतातील उद्योग धंदयाची संख्या वाढण्याचा व त्या रूपाने रोजगारांत वाढ घडून येण्याचा, उत्पादनांची संख्या वाढवून ग्राहकांना चॉईस मिळण्याचा जो उद्देश होता, तो सफल झाला नाही. त्यामुळे जागतिकीकरण आणि आर्थिक उदारीकरण याची प्रक्रिया भारतमध्ये पूर्ण फसली. भारतामध्ये जेवढया विदेशी कंपन्या आल्यात, त्यापैकी जवळपास ९५टक्के कंपन्यांनी भारतातील अस्तीत्वात असलेल्या कंपन्या ताब्यात घेणे आणि त्यांचेच नांव व स्वरूप बदलून त्या चालविण्यासाठी आपल्या दुय्यम कंपन्या स्थापन करणे, असा मार्ग अवलंबिला, अनेकदा त्यांनी विशिष्ट क्षेत्रातल्या अनेक भारतीय कंपन्या ताब्यात घेवून त्यांचे विलीनीकरणही घडवून आणले. त्यामुळे अनेक कामगार बरोजगार झाले.

अशा प्रकारे बेरोजगारीचे कारण सामाज्यशाहीत सापडते. म्हणून भारताने स्विकारलेले मुक्त अर्थव्यवस्थेचे धोरण बेरोजगारी वाढविण्यासाठी कारणीभूत आहे असेच म्हणावे लागेल.

संदर्भ

१) अर्थशास्त्रीय विचारांचा इतिहास – के. एच. ठक्कर
२) जागतिकीकरण की नवी गुलामगीरी – अॅडमिरल विष्णू भागवत
३) बेरोजगारीचे अ(न)र्थशास्त्र – सुलभा ब्रह्मे